# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५

**फोन/फॅक्सनंबर ०७१३२—२२३१०४** **E-Mail** : gug.registrar@gmail.com


गोंवीग/कुलका/जा.क्र/१५४९/२०२१ दिनांक: ३० /१२/२०२१

## अधिसुचना

**(शैक्षणिक सत्र २०२१—२२ च्या प्रवेशाकरीता दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.)**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना व सर्व संबधितांना अधिसुचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे निर्गमित अधिसुचना/जा.क्र./४९१/२०२१ दिनांक २३/११/२०२१ नुसार विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतिम दिनांक १७/१२/२०२१ मुदत समाप्त झाली आहे.

मात्र अपरीहार्य कारणामुळे काही विद्यार्थी विहीत तारखेपर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकले नाही व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. कुलगुरुंच्या परवानगीने **शुक्रवार दिनांक ३१/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० पर्यंन्त** यावेळेत असे विद्यार्थी महाविद्यालयामार्फत प्रवेश घेऊ शकतील.

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंन्द्रीय प्रवेश समितीद्वारे केले जातात त्यांना लागू राहणार नाही. महाविद्यालयाच्या निर्धारीत प्रवेश क्षमतेमध्ये रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी हि मुदत देण्यात येत आहे. यानंतर याबाबत महाविद्यालयातील प्राचार्यांनी पत्रव्यवहार करु नये व परिक्षा विभागाच्या निर्देशानुसार परीक्षा शुल्क नियमानुसार आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये,

३०/१२/२०२१

डॉ. अनिल झेड. चिताडे
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहिस्तव सविनय सादर:—**

१) मा. कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र—कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. वित्त व लेखाधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. विभाग प्रमुख सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७) विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
८) संगणक विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावी.
९) व्यवस्थापक, एम.के.सी.एल., गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.